N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): वाशिम    P.S. (पोलीस ठाणे): वाशिम    Year (वर्ष): 2026

   FIR No. (प्रथम खबर क्र.): 0748    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 18/07/2026 02:27 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

   1 Day (दिवस): शुक्रवार    Date from (दिनांक पासून): 17/07/2026    Date To (दिनांक पर्यंत): 17/07/2026

   Time Period (कालावधी): प्रहर ६    Time From (वेळेपासून): 15:06 तास    Time To (वेळेपर्यंत): 15:58 तास

   (b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):    Date (दिनांक): 18/07/2026    Time (वेळ): 02:06 तास

   (c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):    Entry No. (नोंद क्र.): 003    Date and Time (दिनांक आणि वेळ): 18/07/2026 02:06 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

   1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): उत्तर, 1 कि.मी.    Beat No. (बीट क्र.):

   (b) Address (पत्ता): जिल्हा सामान्य रूग्णालय वाशिम,वाशिम

   (c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

   District (State) (जिल्हा (राज्य)): (महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): डी वाय एस पी जगदीश प्रल्हाद परदेशी

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1982

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग वाशिम, वाशिम, वाशिम, वाशिम, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग वाशिम, वाशिम, वाशिम, वाशिम, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-7507055205

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | सतिश बबन कव्हर | | | 1. Town/Village (शहर / गाव): तामसी,Tehsil (तहसील): वाशिम,Police Station (पोलीस ठाणे): वाशिम ग्रामीण,District (जिल्हा): वाशिम,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी 4000 रूपये | 4,000.00 |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) : 4,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

यावेळी एएसआय 667/ जवादे यांन कलम 7A भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे गुन्ह्याची कायमी करविली.

फिर्याद

लाप्रवि वाशिम

दिनांक:18/07/2026

4/9

नांव:- जगदिश प्रल्हाद परदेशी, वय -44 वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम, मो.नं.7507055205

मी आज रोजी सरकारतर्फे समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंध विभाग वाशिम येथे पोलीस उपअधिक्षक म्हणुन 29/05/2025 पासुन कार्यरत आहे. दि. 15/07/2026 रोजी लाप्रवि कार्यालय वाशिम येथे कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार कार्यालयात हजर आले. त्यांनी त्यांचे नाव श्री.राजेंद्र तुळशिराम उंदरे, वय 56 वर्ष, व्यवसाय- शेती, रा.भुली ता.मानोरा जि.वाशिम असे सांगुन लाचमागणी बाबत तक्रार असल्याचे सांगीतले.त्यानंतर आम्ही मा.अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, वाशिम यांचे कार्यालयातुन दोन सरकारी पंच प्राप्त केले. दोन्ही पंचांना तक्रारदार यांचा परिचय करून दिला. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना तक्रार लिहुन देण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी सांगीतले की त्यांना मराठी वाचता येथेते पण लिहीता येत नाही. त्यामुळे आम्ही तक्रारदार यांना त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतले व पंच क्र.02 यांना तक्रारदार यांनी कथन केलेली तक्रार ही त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहण्यास सागीतली. तक्रारदार यांनी कथन केलेली तक्रार व पंच क्र.02 यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहलेली तक्रार ती पुढीलप्रमाणे "मी वरील ठिकाणी राहत असुन मी शेती व्यवसाय करतो. मी 9 वी पर्यंत शिक्षण घेतलेले असुन मला वाचता व सही करता येते. परंतु लिहीता येत नाही. माझा सन 2021 मध्ये अपघात झाला होता. त्यामुळे माझा उजव्या पाय अधु झाला असल्याने मला व्यवस्थीत चालता येत नाही. उजव्या पायाने चालता येत नसल्याने मला अपंगत्व आले आहे. मला अपंगत्व येवुन सुमारे दोन वर्ष झाल्याने मी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे रितसार अर्ज केला असता मला UNIKQUE DISABILITY ID UD ID 0610619710169327 प्रमाणे Disability 41 टक्के चे अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिनांक 12/08/2023 ते दिनांक 12/05/2025 पावेतो मिळाले होते. सदर प्रमाणपत्राची मुदत संपल्यानंतर मी दिनांक 09/03/2026 रोजी नविन अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत Renewal reciept जीचा Enroiment no. 27060000023050509034 प्रमाणे जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांचे नावाने ऑनलाईन पावती भरली होती.त्यावेळी तेथील डॉक्टरांनी मला तपासले होते. सदर पावती भरल्यानंतर मी जिल्हा सामान्य रुग्णालयातील अस्तिरोग कक्षा मधील कंपाउंडर श्री सतिश कव्हर, अस्ती विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांचे कडे जावुन प्रमाणपत्रासाठी वारंवार भेटलो. परंतु त्यांनी माझे प्रमाणपत्र दिले नाही.

मी दिनांक 10/07/2026 रोजी परत जिल्हा सामान्य रुग्णालयातील संबंधीत श्री सतिश कव्हर, अस्थि विभाग यांना जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे जावुन भेटलो व त्यांना माझे कडे असलेली ऑनलाईन भरलेली पावती दाखवून त्यांना मी नविन अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याची विनंती केली. तेव्हा कंपाउंडर श्री सतिश कव्हर यांनी मला तुम्हाला अपंगत्वाचे प्रमाणपत्र पाहिजे असल्यास 20,000 रुपये दयावे लागतील नाही तर प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यावर मी श्री सतिश कव्हर यांना इतके पैसे कशाचे दयावे लागता, प्रमाणपत्र तर फुकट मिळते असे बोलल्यावर श्री कव्हर यांनी मला पैसे दिल्याशिवाय अपंगत्याचे प्रमाणपत्र मिळणार नाही, सर्वच देतात तुम्हांलाही दयावे लागतील असे सांगीतल्याने मी श्री कव्हर यांना इतके पैसे खुप होतात असे म्हटल्यावर त्यांनी मला जाउ दया तुम्ही 10,000 रुपये दया तुम्हांला लगेच प्रमाणपत्र देतो नाहीतर प्रमाणपत्र मिळणार नाही असे बोलल्याने व त्यांना पैसे दिल्याशिवाय श्री कव्हर हे मला अपंगत्वाचे प्रमाणपत्र देणारच नाही अशी

माझी खात्री झाल्याने मी त्यावेळी त्यांना नाइलाजास्तव त्यांनी मागीतलेली लाच रक्कम 10,000 रुपये देण्याचे मान्य केले. परंतु अपंगत्वाच्या प्रमाणपत्रासाठी कुठलीही फि दयावी लागत नाही हे मला माहित आहे. माझी पैसे देण्याची इच्छा नाही. कंपाऊंडर श्री.सतिश कव्हर, अस्ती विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपसी दुश्मनी नाही. कंपाउंडर श्री.सतिश कव्हर, अस्ती विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांच्यावर कारवाई करावी या करीता तक्रार देत असुन सदर तक्रारी सोबत मी UNIKQUE DISABILITY ID UD ID 0610619710169327 प्रमाणे Disability 41 टक्के चे अपंगत्वाचे प्रमाणपत्राची व नविन अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतRenewal reciept जीचा Enroiment no.27060000023050509034 प्रमाणे जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांचे नावाने ऑनलाईन पावती भरल्याची झेरॉक्स प्रत देत आहे. त्यांचेवर कारवाई होणेस विनंती आहे." सदर तक्रारीवर तक्रारदार यांनी स्वतः व दोन्ही पंचानी तसेच समक्ष म्हणुन मी सुध्दा सही केली. आम्ही तक्रारदार यांना कंपाउंडर श्री सतिश कव्हर हे लाच मागणी करतात किवा नाही? हे पडताळणी करणे आवश्यक असल्याचे सांगीतले. तक्रारदार यांना कंपाउंडर सतिश कव्हर हे कोठे भेटतील अशी विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगीतले की, कंपाउंडर सतिश कव्हर हे जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथील त्यांचे कार्यालयात भेटतील.

तक्रारदार यांना कंपाउंडर सतिश कव्हर हे दि.15/07/2026 रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथील त्यांच्या कार्यालयात भेटी दरम्यान अपगंत्वाचे प्रमाणपत्र देण्यासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबतची पडताळणी करणे आवश्यक आहे. कंपाउंडर सतिश कव्हर यांची आज दि. 15/07/2026 रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथील त्यांच्या कार्यालयात भेट होणार असल्याने सदरची तक्रार पडताळणी कार्यवाही दि.15/07/2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले. तसेच पंच क्र.01 श्री घुले यांना तक्रारदार यांचे सोबेबत पाठविण्यात येणार असल्याचे आम्ही सांगीतले. सदरचा पडताळणीपुर्व पंचनामा पुर्ण करण्यात आला. त्यानंतर पडताळणी कारवाई दरम्यान आम्ही पंच क्र.01 यांचे मोटर सायकलवर तक्रारदार यांना बसवुन कंपाउडर सतिश कव्हर यांना भेटण्यासाठी पाठविण्यात येणार असल्याचे सांगीतले. तसेच तक्रारदार यांचे शर्टाचे आतुन बनीयानला व्हाईस रेकॉडर लावले व पंच क्र.01 यांचे खाजगी दुचाकीने कंपाउंडर सतिश कव्हर यांची भेट घेणेकामी जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथील त्यांच्या कार्यालय 13.43 वा. चे सुमारास रवाना केले. आम्ही व पंच क्र.2 तसेच स्टाफ असे ला.प्र.वि.कार्यालय वाशिम येथे थांबून राहिलो. 14.44 वा. चे दरम्यान तक्रारदार श्री.राजेंद्र तुळशिराम उंदरे व पंच क्र.1 हे पंच यांचे खाजगी वाहनाने ला.प्र.वि कार्यालय वाशिम येथे परत आले. पंच क्र.01 व पंच क्र02 यांच्या समक्ष तक्रारदार यांना घडलेल्या हकीकत बाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगीतले की पंच क्र.01 सह ते जिल्हा सांमान्य रुग्णालय वाशिम येथील कंपाउंडर सतिश कव्हर याचे कार्यालयात गेलो, सुरवातीला तक्रारदार यांना कंपाउंडर कव्हर दिसले नाही. थोडयाच वेळात कंपाउंडर सतिश कव्हर तथे आले व तक्रारदार व कंपाउंडर सतिश कव्हर यांचेत संभाशण सुरु झाले संभाषणा दरम्यान तक्रारदार म्हणाले साहेब..आयका न आपल्याला लय वाढलोक थांबता होत नाही पायाचान.. म्हणुन मी..त्यावर सतिश कव्हर म्हणाले नाही का...बर बर...तक्रारदार म्हणाले काही कमी जमतीन ना पैसे..त्यावर सतिश कव्हर म्हणाले काही टेंशन घेवुन नका ना तुम्ही...तक्रारदार म्हणाले ते बी तेबी पंन्नासच्या वर

देजा...त्यावर सतिश कव्हर म्हणाले टेंशन घेवू नका जास्त..तक्रारदार म्हणाले परमनंट त्यावर सतिश कव्हर म्हणाले टेंशन घेवु नका जास्त.... तुमचा डबल झाला का अँक्सीडंट.. तक्रारदार म्हणाले हो डबल झाला. सतिश कव्हर म्हणाले किती आणले होते तुम्ही.... तक्रारदार म्हणाले अ...त्यावर सतिश कव्हर म्हणाले किती आणले....तक्रारदार म्हणाले किती पायजेत... त्यावर सतिश कव्हर म्हणाले का आणलेच नाही? तक्रारदार म्हणाले आणले पण किती पाहिजेत...त्यावर सतिश कव्हर म्हणाले तुमच्या मनान.... तक्रारदार म्हणाले अ... परमानंट झाल पाहिजेत... त्यावर सतिश कव्हर म्हणाले हो.. तक्रारदार म्हणाले हु... पंन्नासचे वरती टक्के दया.. त्यावर सतिश कव्हर म्हणाले पन्नास टक्के परमानंट झाल न मग ... तक्रारदार म्हणाले पण.. त्यावर सतिश कव्हर म्हणाले चाळीस च्या वर... तक्रारदार म्हणाले हो.. चाळीसच्या वर जावू दे...मग ते चाळीसही असले त चालते. त्यावर सतिश कव्हर म्हणाले एक चक्कर मारा पाय मोकळा करा तुमचा .... असे बोलणे झाल्यावर तक्रारदार हे तेथुन बाहेर आले. मी व तक्रारदार असे माझ्या दुचाकी वाहनाने लाप्रवि कार्यालयात परत आलो. अशी हकीकत सांगीतली. त्यानंतर पंच क्र.01 यांनी संध्दा तक्रारदार यांनी सांगीतलेल्या हकीकत प्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर सदरची रेकॉर्डीग आम्ही सर्वांनी संगणकावर ऐकली. परंतु कव्हर यांनी वरील संभाषणात लाचेची स्पष्ट आकडयाचे स्वरुपात मागणी केलेली नसल्याने तक्रारदार यांना परत कंपाउंडर सतिश कव्हर यांचे कडे पाठवून त्यांची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्र.01 यांचे सह कंपाउंडर सतिश कव्हर यांची भेटीसाठी पाठवीले असता कंपाउंडर सतिश कव्हर यांचे कार्यालयाला कुलुप लावलेले दिसले. वरील पंचनाम्याच्यावेळी पंच क्र.01 हे तक्रारदार सोबत पाठविण्यात आले होते व पंच क्र02 हे लाप्रवि कार्यालयात पथकासोबत हजर होते.

त्यानंतर तक्रारदार यांनी पंचासमक्ष केलेल्या विनंती वरुन पुढील पडताळणी कारवाई दि.17/07/2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले. दिनांक 17/07/2026 रोजी तक्रारदार हे लाप्रवि कार्यालय वाशिम येथे हजर आले, दोन्ही पंच हे कार्यालयातच हजर होते. तेथुन आम्ही सर्व श्री रामराव सरनाईक महाविद्यालय वाशिम च्या बाजुला असलेल्या मोकळया जागी गेलो. तेथे आम्ही पडताळणी बाबत सुचना तक्रारदार व पंच यांना दिल्या. तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर लावुन 11/16 वा पंच क्र.01 यांचे मोटर सायकलवर जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे कंपाउंडर सतिश कव्हर यांचे भेटण्याकरीता पाठविले काही वेळाने 12/24 वा. तकारदार व पंच क्र.01 हे श्री रामराव सरनाईक महाविद्यालय वाशिम च्या बाजुला असलेल्या मोकळया जागेत परत आले. तक्रारदार यांनी हकीकत सांगीतली की त्यांची व सतिश कव्हर यांचे सोबत त्यांचे कार्यालयात भेट झाली. भेटी दरम्यान सतिश कव्हर तक्रारदार यांना म्हटले, एँक्सेडेन्ट झालता की काय.... त्यावर तक्रारदार हे सतिश कव्हर यांना म्हटले, हं..... त्यावर सतिश कव्हर तक्रारदार यांना म्हटले, हे घे याची...हिच प्रिन्ट राहुद्या झेरॉक्स लावा सर याची झेरॉक्स काढायच काम नाई...पोष्टान तुमच्या घरी येईल त्यावर तक्रारदार हे सतिश कव्हर यांना म्हटले किती टक्के हाय.. याच्यावर हाय का? यावर सतिश कव्हर तक्रारदार यांना म्हटले, पंचेचाळीस टक्के दिल... (सतिश कव्हर यांनी हाताच्या बोटांनी पैशाचा इशारा केला असता) त्यावर तक्रारदार हे सतिश कव्हर यांना म्हटले हाव किती देऊ... त्यावर सतिश

कव्हर तक्रारदार यांना म्हटले किती हायत.. त्यावर तक्रारदार हे सतिश कव्हर यांना म्हटले चार पाचशे आणले.... त्यावर सतिश कव्हर तक्रारदार यांना म्हटले आं, या तुमच्या मतानं द्या बस.... त्यावर तक्रारदार हे सतिश कव्हर यांना म्हटले नाई किती द्यायचे ते सांगा त्याच्या पाशी आकडा देउन टाकतो... मी काई येत नाई आता त्यावर सतिश कव्हर तक्रारदार यांना म्हटले किती पर्यंत होईल.... यावर तक्रारदार हे सतिश कव्हर यांना म्हटले, तुमाल किती द्यायचे तेवढ करते माणुस तस त माई इच्छा हाय काही जास्ती द्यायचे नाई, त्यावर सतिश कव्हर तक्रारदार यांना म्हटले, सांगात खरी...यावर तक्रारदार हे सतिश कव्हर यांना म्हटले, हजार, दोन हजार द्यायचे बस...अं..किती देवु मंग....तुम्ही सांगा त्याच्या पाशी देवुन टाकतो..यावर सतिश कव्हर तक्रारदार यांना म्हटले, पाच द्या मंग...यावर

तक्रारदार हे सतिश कव्हर यांना म्हटले पाच...बर जरशे कमी करा म्हणा...साडे पाच..हंहं... साडे चार...त्यावर सतिश कव्हर तक्रारदार यांना म्हटले, बर ठिक हाय... ...यावर तक्रारदार हे सतिश कव्हर यांना म्हटले पाचशे कमी करा... त्यावर सतिश कव्हर तक्रारदार यांना म्हटले, चालते काही हरकत नाही... ठिक हाय ...यावर तक्रारदार हे सतिश कव्हर यांना म्हटले हो.. यावर सतिश कव्हर तक्रारदार यांना म्हटले, चार हजार ...यावर तक्रारदार हे सतिश कव्हर यांना म्हटले हो चार हजार देवुन टाकतो... अशा प्रकारचे संभाषण झाले. सदरचे संभाषण आम्ही लाप्रवि कार्यालय वाशिम येथे येवुन संगणकावर ऐकले असता पडताळणी कारवाईमध्ये सतिश कव्हर यांनी तक्रारदार यांना अपंगाचे प्रमाणपत्र देण्यासाठी 5000/- रुपयेची लाच मागणी करून तडजोडी अंती 4000/- रु लाच मागणी केली. लाच रक्कम ही काही वेळातच सतिश कव्हर यांना दयावयाची असल्याने सापळा कारवाई ही आजच दि.17/07/2026 रोजी करण्याचे ठरले. सदरचा पडताळणी पंचनामा क्र.02 करण्यात आला.दि.17/07/2026 रोजी सापळा कारवाई ही जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे करण्याचे ठरल्याने सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार व पंचाना सुचना दिल्या. तसेच तक्रादार याना लाच रक्कम स्विकारल्याचा ईशारा म्हणुन त्यांचे जवळील पिशवी ही हातातुन खांदयावर घेण्याचा इशारा सांगीतला. तक्रारदार यांना लाच रक्कम चार हजार रुपये हजर करण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी चार हजार रुपये पंचासमक्ष हजर केलेत. सदर लाच रक्कमेस अँथ्रॉसिन पावडर लावली व तक्रारदार यांचेकडे लाच रक्कम देउन व्हाईस रेकॉर्डर त्यांचे शर्टाचे आतुन बनियानला लावला व जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे रवाना 15/06 वा केले. सापळा पथक सुदधा जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे रवाना होउन जि.सा.रु वाशिम येथे दबा धरुन बसले. सापळा कारवाई दरम्यान गै.अ.यांनी तक्रारदार यांना म्हटले की, काय म्हणता आणले का? त्यावर तक्रारदार यांनी गै.अ.सतिश कव्हर यांना म्हटले की, मोजुन घेजा पाहयजा बरोबर हायेत न... मोजुन घेजा त्यानंतर 15/56 वा तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेचा ईशारा केल्याने आम्ही व सापळा पथक हे सतिश कव्हर यांचे जवळ पोहचुन त्यांच्या कडुन लाच रक्कम दोन्ही पंचासमक्ष हस्तगत केली व त्यांना ताब्यात घेतले. सतिश कव्हर यांना पुढिल कारवाई करीता ला.प्र.वि.कार्यालय वाशिम येथे आणण्यात आले. आरोपी कव्हर यांचे निवेदन घेण्यात आले आहे. पडताळणी पंचनामा क्र.2 व सापळा कारवाई दरम्यान पंच क्र.01 हे तक्रारदार सोबत हजर होते व पंच क्र.2 पथका सोबत हजर होते. आरोपी खाजगी ईसम, सतिश बबन कव्हर, वय 33 वर्ष, रा.तामसी यांनी तक्रारदार यांना अपंगाचे प्रमाणपत्र देण्यासाठी दि.15.07.2026 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान स्पष्ट लाचेचा आकडा

आलेला नसल्याने त्याची दि.17.07.2026 रोजी पडताळणी कारवाई क्र.02 करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान सतिश कव्हर यांनी तक्रारदार यांना अपंगाचे प्रमाणपत्र देण्यासाठी 5000/- रुपयेची लाच मागणी करुन तडजोडी अंती 4000/- रु लाच मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले. दि.17.07.2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान 15/06 वा ते 15/58 वा चे दरम्यान 4000/- रु लाच रक्कम पंचासमक्ष अस्थी विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे स्विकारली. सदर सर्व कारवाई दरम्यान आरोपी सतिश कव्हर यांनी तक्रारदार यांना तेच अपंगत्वाचे प्रमाणपत्र देणारे शासकीय कर्मचारी असल्याचे भासवून व प्रभाव पाडुन तक्रारदार यांच्याकडे लाच मागणी करुन लाच रक्कम स्विकारल्याने त्यांचे हे कृत्य कलम 7A भ्रष्टचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे होत असल्याने माझी त्यांचे विरुध्द सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे.सही(जगदीश परदेशी) पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.वाशिम.अशा फीर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून पुढील तपास जगदीश परदेशी पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.वाशिम. यांच्याकडे देण्यात आला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** Gajanan Govindrao Jawade **Rank (हुद्दा):** सहाय्यक पोलीस उप-निरीक्षक

**No. (क्र.):** 67339 **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

Digitally Signed by: SANJAY NAMDEO CHOUDHARI
Rank: I (Inspector)
Unique No: 91169380031000143
On: 7/18/2026 2:34:23 AM
At PS: WASHIM, WASHIM

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SANJAY NAMDEO CHOUDHARI

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**